सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**क्रमांक : १४७७/रासेपू/९००७/१५** **दिनांक : २६ डिसेंबर, २०२२**

**विषय :-** राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या वर्णनात्मक/ पारंपारिक स्वरूपाच्या प्रश्नपत्रिकांच्या उत्तरे लिखाणाच्या माध्यमाबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमातील पेपरच्या माध्यमाबाबत उमेदवारांना पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. **पेपर क्रमांक ३ ते ७** :- मुख्य परीक्षेतील पेपर क्र. ३ ते ७ हे पाचही पेपर एकतर मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेत सोडविणे आवश्यक राहील.

२. **पेपर क्र. ८ व ९ (वैकल्पिक विषय पेपर १ व २)** :-

२.१ वैकल्पिक विषयातील ज्या पेपरसाठी केवळ ‘मराठी’ भाषेचे माध्यम निश्चित केलेले आहे, त्याकरीता उमेदवाराने मराठी भाषेतून उत्तरे सोडविणे अनिवार्य राहील.

२.२ वैकल्पिक विषयातील ज्या पेपरसाठी केवळ ‘इंग्रजी’ भाषेचे माध्यम निश्चित केलेले आहे, त्याकरीता उमेदवाराने इंग्रजी भाषेतून उत्तरे सोडविणे अनिवार्य राहील.

२.३ वैकल्पिक विषयातील ज्या पेपरसाठी ‘मराठी व इंग्रजी’ भाषेचे माध्यम निश्चित केलेले आहे त्याकरीता उमेदवाराने ‘मराठी किंवा इंग्रजी’ यापैकी एकाच भाषेची निवड करणे अनिवार्य राहील. निवड केलेल्या भाषेचे माध्यम हे वैकल्पिक विषयाच्या दोन्ही पेपरकरीता अनिवार्य राहील.

**ठिकाण : मुंबई**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**